**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३८६/२०१७ मधील निशाणी १११ वरील आदेश**
**रविंद्र केंपवाडे वि. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका**
**CNR NO.MHSNO20014782017**

प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी, त्यांच्या विरुध्द 'उलटतपास नाही' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदरहु अर्जाला अनुषंगून वादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

०३. अर्जाला अनुषंगून मुळ दाव्याचे अवलोकन केले तर, वादी यांनी दावा ठरावाकरीता व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी दिनांक २४/०७/२०२३ रोजी निशाणी क्रमांक १०३ कडे सरतपास दाखल केलेला होता. त्यानंतर दिनांक २६/०९/२०२३ व १२/१०/२०२३ या तारखांना प्रतिवादी यांनी वादींचा उलटतपास घेतला नाही त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा हुकुम पारीत करण्यात आलेला होता. त्यानंतर प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे तो रद्द होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०४. प्रतिवादी क्रमांक १ व २ ही महानगरपालिका आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे उलटतपास घेण्याच्या दृष्टीने ज्या तत्कालीन अधिकारी यांच्याकडे कागदपत्र उपलब्ध होती त्यांची अचानक बदली झाल्यामुळे उलटतपास घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्र प्रतिवादींकडुन प्राप्त होऊ शकलेली नाहीत. निश्चितच, प्रतिवादी क्रमांक १ व २ ही शासकीय संस्था असल्याने जर त्यांच्या कार्यरत असणा–या

कर्मचा–यांची बदली झाली तर नविन अधिका–यांनी पदभार स्वीकारुन केसला अनुषंगून कागदपत्र वकीलांना देण्यास काही कालावधी लागु शकतो ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, सदरहु दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना वादींचा उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक ठरते. सबब, प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्याविरुध्द पारीत करण्यात आलेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन त्यांना वादींचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. सबब, आदेश खालीलप्रमाणे –

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही असा पारीत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येतो व नि. १११ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादी यांचा उलटतपास पुढील तारखेस पुर्ण करावा असे त्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही.

४. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

ABHAY ASHOK MEHENDALE
Digitally signed by ABHAY ASHOK MEHENDALE
Date: 2024.03.19 16:00:59 +0530

सांगली. **(अ. अ. मेहेंदळे)**
दिनांक १९/०३/२०२४ २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.

# प्र मा ण प त्र

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | १९/०३/२०२४. |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | १९/०३/२०२४. |